पारावरच्या गप्पा

# गव्हाचा काड- भुस्सा लाखमोलाचा; तो पेटवण्याचा मूर्खपणा नको!



संपत देवदर्शन घेऊन पारावर येऊन बसला होता. बराच वेळ झाला तरी गणपत आला नाही. वाट बघून निघणारच होता तेवढ्यात गणपत आला. देवदर्शन घेऊन तोही संपतजवळ बसला- त्यावर संपत म्हणाला, ''का रं गंपा, आज काय झोपबीप झाली नाही काय? उशिरा उठलाय वाटतंय. म्हणूनच वेळ झाला का?''

त्यावर गणपत म्हणाला, ''नाही रं संपा, लवकर उठलो होतो पण ते गव्हाचे काड पेटवायला गेलो होतो. सर्व रानातील गव्हाचा भुस्सा- काड पेटवता पेटवता वेळ झाला बघ.''

यावर मात्र वैतागून संपत म्हणाला, ''अरे वा रं पठ्ठ्या, म्हणजे तू तुझ्या शेतातील गव्हाचे काड- भुस्सा जाळून टाकला. सकाळी सकाळीच फार वाईट काम केले गंपा तू.''

यावर हसत गणपत म्हणाला, ''का रं? तुला का वाईट वाटलं एवढं? मी काय सोनं की काही मौल्यवान वस्तू पेटवून दिल्यासारखा गुन्हा केल्याच्या तोऱ्यात बोलतोय तू!''

त्यावर संपत म्हणाला, ''हो गंपा, तू गुन्हाच केला आणि तोही फार मोठा गुन्हा! एक तर शेती किंवा निसर्ग असा कोणताही पदार्थ तयार करत नाही, की ज्याला काहीही किंमत नाही आणि ती आपण पेटवून द्यावी. एक तर निसर्गाचा नियम आहे जे प्रत्येक सजीवाला पाहिजे ते त्याने निसर्गाकडून घ्यावे आणि त्या बदल्यात निसर्गाला काहीतरी द्यावे. आपण तर निसर्गाकडून सर्वच बाबी ओरबाडून घेत आहोत. आता तूच बघ की, तू गव्हाचे धान्य घरी नेले आणि कमीत कमी गव्हाचा राहिलेला भाग तरी निसर्गाला म्हणजेच ज्या जमिनीतून ते पीक घेतले तिला अर्पण करण्याची आवश्यकता होती. म्हणजे यातून जमिनीला खाद्य/ खत झाले असते. त्यामुळे जमिनीचा पोत चांगला राहिला असता.''

यावर गणपत म्हणाला, ''आरं संपा, गव्हाचा भुस्सा शेतात लवकर कुजत नाही आणि त्यामुळे पुढचे पीक पिवळे पडते. म्हणून सर्व शेतकरी गव्हाचा भुस्सा- काड शेतात गाडत नाहीत.''

यावर संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, आपण चुकीच्या पद्धतीने शेतात भुस्सा- काड गाडतो. त्यामुळे ते कुजत नाही. दुसरे असे की ते कुजत असताना त्यामध्ये जास्त प्रमाणात कर्ब असल्यामुळे कर्ब- नत्र प्रमाण संतुलित करून कुजण्याची क्रिया होण्यासाठी ते जमिनीतून नत्र घेते. आपण पिकाला लवकर नत्र दिले नाही किंवा कुजत असताना नत्राचा वापर केला नाही तर जमिनीमध्ये नत्राचे प्रमाण कमी होऊन पुढचे पीक पिवळे पडते. म्हणून गव्हाचा भुस्सा- काड जमिनीमध्ये गाडल्यानंतर जे पीक घेतो त्याला सुरुवातीला जास्त प्रमाणात नत्रयुक्त खतांचा वापर करावा लागतो.''

यावर गणपत म्हणाला, ''आता समजलं बघ मला संपा. तरी म्हणालो की पीक पिवळं का पडतंय? पण मला एक सांग संपा, गव्हाचे काड- भुस्सा यात काय असतं रे एवढं की ज्याला जमिनीत गाडून कुजविण्यासाठी एवढे प्रयत्न करावे, असं तू म्हणतो?''

यावर हसून संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, जमिनीने पिकविलेला प्रत्येक भाग मौल्यवान असतो. आपण पिकाकडून भाजीपाला, फळे, कापूस, ऊस हे सर्व भाग आपल्या फायद्यासाठी घेतो. पिकाचा नको असलेल्या भागाची आपण

अनेक प्रकार करून विल्हेवाट लावतो. परंतु निसर्गाचा विचार केला तर हाच पिकाचा भाग योग्य पद्धतीने वापरला तरच निसर्गाचा फायदा होतो, नाही तर त्याचा लोप होतो. आता साधा विचार कर, तू गव्हाचे काड- भुस्सा पेटवून दिला, त्यामुळे धूर झाला म्हणजेच या धुरातून हवेतील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढले. ज्यामुळे तापमान वाढते, हवा दूषित होते. तुला माहीत आहे गंपा, पंजाब- हरियाणामध्ये गव्हाचा भुस्सा- काड जाळल्यामुळे तेथे तसेच दिल्ली शहरावर काळे ढग येतात तर कधी काळा पाऊस पडतो. त्यामुळे तेथे आता कायदा करून त्यावर बंधने आणली. गव्हाचा काड- भुस्सा जाळल्यामुळे जमिनीमध्ये असलेले जिवाणू मरतात. तसेच सेंद्रिय पदार्थांचेही ज्वलन होते. यामुळे जमिनीची प्रत खालावते म्हणजे पिकाचे अवशेष जाळल्यामुळे एवढे तोटे होतात. याच्या उलट जर गव्हाचा भुस्सा- काड न जाळता ते जमिनीत गाडले तर एकरी कमीत कमी दोन- तीन टन सेंद्रिय पदार्थ जमिनीला मिळतो. आपण जमिनीमध्ये रासायनिक खते टाकतो. फारच कमी प्रमाणात शेणखत- सेंद्रिय खत टाकतो. गव्हाचे काड असो की इतर पिकांचे अवशेष हे जर जमिनीत गाडले गेले तर त्यामुळे जमिनीमधील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढते. सेंद्रिय पदार्थ हेच खरं जमिनीचे खाद्य आहे. या सेंद्रिय पदार्थांवरच जमिनीतील जीवजिवाणू- गांडुळे आपला उदरनिर्वाह करून जमिनीला जिवंत ठेवतात. ताकदवान बनवतात. तसेच या सेंद्रिय पदार्थांमुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते, जमीन भुसभुशीत राहून हवा- पाणी यांचे संतुलन राहते, त्यामुळे पिकाच्या मुळांची चांगली वाढ होऊन त्याच्याद्वारे अन्नद्रव्ये- पाणी शोषण्याची क्रिया चांगली होते. आणि त्याचमुळे नंतरच्या पिकाचे उत्पादन वाढते. म्हणून गव्हाचा भुस्सा- काड म्हणजे आपल्या भूमातेचा उत्तम आहार.''

यावर मात्र गणपतचा चेहरा एकदमच पडला. ''आरं संपा, तू म्हणतो तसं मी आज मात्र मोठा गुन्हा केल्यासारखं वाटायला लागलंय. ही गोष्ट मला आज समजली. यापुढे मी कधीही गव्हाचा भुस्सा- काड पेटवून देणार नाही. कारण आपली भूमाता टिकली तरच आपल्यासारखे भूमिपुत्र जगू शकतील.''

गणपतच्या खांद्यावर हात ठेवून संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, गव्हाचा काड- भुस्सा हे भूमातेचे जसे खाद्य आहे तसेच ते गोमाताचेही खाद्य आहे. निसर्गाने फार मस्त चक्र तयार करून दिले बघ गंपा. आपण जमिनीत बी टाकायचे. तसेच जमिनीला- पिकाला खत - पाणी देऊन त्याचे संगोपन करायचे. जमीन त्यावरच एक चांगले पीक देईल. आपण या सर्व पिकांतून आपल्याला जी गोष्ट आवश्यक आहे ती घ्यायची आणि राहिलेली जमिनीला म्हणजे भूमातेला द्यायची. या पिकाचा काही भाग आपण गाय- गोमातेला खाऊ घातला तर त्या बदल्यात गोमाता शेण- गोमूत्र देते. हे भूमातेचे जणू खाद्यच आहे. या खाद्यामुळे जमिनीची प्रत सुधारते आणि परत पिकाचे चांगले उत्पादन येते. अशा प्रकारे एक चक्र पूर्ण होते. या चक्रामध्ये आपण व्यत्यय न आणता याला उपयुक्त अशा गोष्टी केल्या पाहिजे. आपण मात्र उलटे करतो. हेच निसर्गचक्र मोडण्यासाठी किंवा संपवण्यासाठी आपण प्रयत्न करतो परंतु हे मात्र आपण विसरलो की ज्या फांदीवर आपण बसलो आहोत तीच फांदी आपण तोडली तर फांदी तोडायच्या नादात आपणही खाली पडतो. म्हणून मित्रा, आपणही या निसर्गचक्रातील एक भाग असून या चक्राला ताकद देण्याचे काम आपले आहे.''

यावर गणपत आत्मविश्वासाने बोलला, ''हे बघ संपा, मला आता तू सांगितलेल्या सर्व बाबी पटल्या आहेत. यापुढे मी शेतातील कोणताही काडीकचरा पेटवणार नाही, अशी शपथ घेतो. पण मला एक गोष्ट सांग संपा, तू आता म्हणाला की गव्हाचा भुस्सा हे गोमातेचे खाद्य आहे. हे मात्र मला नाही समजलं. गव्हाचा भुस्सा मीही गाईंपुढे टाकून बघितला पण त्या भुश्श्याला तोंड लावायला तयार नसतात. आणि तू म्हणतो की गव्हाचा भुस्सा म्हणजे गोमातेचे खाद्य आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या गव्हाच्या भुश्श्यातून गाईला काय मिळणार आहे? आपण ऊस घालतो, ऊसाचे वाढे घालतो, गिनी गवत घालतो तसेच इतरही अनेक प्रकारचा चारा घालतो. तरीही गाईंच्या तब्बेती सुधारत नाही. दुधाचे उत्पादन वाढत नाही तसेच दुधाला फॅटही लागत नाही. म्हणजे एवढे खाद्य, चारा देऊनही त्यांचे उत्पादन वाढत नाही आणि आता तर तुझे म्हणजे नवलच झाले. तू म्हणतो गव्हाचा भुस्सा म्हणजे गाई- गोमाता यांचे खाद्य आहे.''

यावर मोठ्याने हसून संपत म्हणाला, ''गंपा, कसं सांगू तुला! एक तर तू प्रत्येक काम करताना त्या पाठीमागची भूमिका काय आहे, शास्त्र काय आहे? आपण ते का करायचं? कधी, केव्हा, कसं करायचं? याबाबत कधीच विचार करत नाही. आता तू म्हणतो गाईला- गोमातेला एवढे खाऊ घालतो तरी उत्पादन होत नाही. आता तर माझे मत आहे की गाईला गव्हाचा भुस्साच नाही तर इतरही पिकांचे अवशेष खाऊ घाल. त्याचा नक्कीच फायदा होईल. पण गंपा, आता फार उशिर झाला. तुला पुढच्या वेळी मात्र यावर सविस्तर सांगेल. चल गप्पा मारत बसलो तर लाईट जाईल आणि मग पिके आपल्या आणि पाण्याच्या नावाने बोंबा मारतील. चल उठ, चहा घेऊ आणि जाऊ शेताकडे...''

**(पूर्वा कृषिदूत परिवार)**